# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २२८–२०१०/ दिनांक :

**केस क्र. २२८/२०१०**

| | |
|---|---|
| श्रीमती शकुंतला शंकर गुगवाड,<br>रा. शेड्याळ, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल )
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्रीमती शकुंतला शंकर गुगवाड, रा. शेड्याळ, ता. जत, जि. सांगली यांनी आपले प्रतिनिधी श्री.खापरे यांच्यामार्फत मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ चे कलम ६.१० च्या तरतुदीनुसार दि. २८.९.२०१० ला तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

ग्राहकाने आपल्या मुचंडी येथील शेतीपंपासाठी नवीन वीज पुरवठा मिळावा यासाठी रितसर अर्ज दिला असून व त्याची फी रु. ५०/- पावती क्र. ५३२११९१ दि. ३.८.२००९ रोजी भरलेली आहे. वितरण कंपनीने कृती मानके विनियमानुसार त्यांना दि. २.९.२००९ पर्यंत चलन देणे आवश्यक होते. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. ४६७ दि. ६.९.२००९ नुसार रितसर तक्रार दाखल केली. कक्षाने दि. १३.९.२०१० रोजी आदेश पारीत केला. मंचाकडून अपेक्षित मदत – कृती मानके विनियमानुसार चलन देण्यास झालेल्या विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर आज दि. १०.११.२०१० रोजी सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार प्रतिनिधी हजर. वितरण कंपनीतर्फे श्री.क्षीरसागर, नोडल ऑफीसर, सांगली, श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता कवठे महांकाळ विभाग हे हजर होते.

ग्राहकाने प्रोसेसिंग फी रु. ५०/- भरल्याचे पुष्ट्यर्थ दि. ३.८.२००९ च्या पावतीची झेरॉक्स हजर केली आहे. दि. १४.१०.२०१० रोजी चलन दिल्याचे व चलनास विलंब झाल्याचे वि.प.ने मान्य केले. दि. २.९.२००९ पासून दि. १३.१०.२०१० या कालावधीतील विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे ५८ आठवड्यांच्या विलंबापोटी रु. ५८००/- भरपाई देणेची वि.प.ची जबाबदारी आहे व ग्राहकाचा तो हक्क आहे, कारण कृती मानके विनियमातील तरतुदींचे पालन करण्यात वि.प.ला अपयश आलेले आहे.

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने दि. २.९.२००९ पासून दि. १३.१०.२०१० या कालावधीतील विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे ५८ आठवड्यांच्या विलंबापोटी रु. ५८००/- ग्राहकास भरपाई म्हणून रितसर वीज जोडणीनंतर दोन बिलींग सायकलमध्ये समायोजन करुन उर्वरित रक्कम रोखीने द्यावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.